# शेतकरी उत्पादक कंपनीच्या स्थापनेसाठी मार्गदर्शक सूचना

## पार्श्वभूमी :-

महाराष्ट्र स्पर्धाक्षम कृषि विकास प्रकल्पाचा शेतकरी हा प्रमुख केंद्रबिंदू असून, शेतकऱ्यांचे गट, उत्पादक संघ/कंपनी, हे या प्रकल्पाचे प्रमुख लाभार्थी आहेत. एकट्या शेतकऱ्याच्या प्रयत्नापेक्षा गटातील सर्व सदस्य शेतकऱ्यांनी केलेल्या प्रयत्नामुळे फायदा होतो व गटांनी शेतीसह अनेक क्षेत्रामध्ये यशस्वीपणे कामे करून सभासदांची आर्थिक स्थिती सुधारण्यास मदत झाली आहे. बचत गटाच्या धर्तीवर सदर शेतकरी उत्पादक गटांची निर्मीती व त्यांची क्षमता बांधणी करून उत्पादक संघ/कंपनीमध्ये रूपांतर करण्याचे काम महाराष्ट्र स्पर्धाक्षम कृषि विकास प्रकल्पामार्फत करण्यात येत आहे.

बाजारपेठेतील असणारी मध्यस्थांची मोठी साखळी व त्यांची एकाधिकारशाही, शेतकऱ्याकडील कमी प्रमाणात असणारा उत्पादीत शेतमाल, गावपातळीवर सुगी पश्चात सुविधा व तंत्रज्ञानाचा अभाव यामुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होते. या अनुषंगाने महाराष्ट्र स्पर्धाक्षम कृषि विकास प्रकल्पाअंतर्गत शेतकऱ्यांच्या उत्पादक कंपनीची स्थापना करून त्यांना शेतकरी सामुदायिक सुविधा केंद्र (Farmers Common Service Center-FCSC) उभारणीकरीता आर्थिक सहाय्य दिले जाते. शेतकरी सामुदायिक सुविधा केंद्रा अंतर्गत उत्पादक कंपन्यांनी गावस्तरावर मुलभूत सुविधा जसे, चाळणी यंत्र, प्रतवारी मशिन, उत्पादीत मालाचे पॅकींग इ. बाबींचा अवलंब करून उत्पादीत कंपनीच्या सभासदांनी / बिगर सभासदांनी उत्पादित शेतीमालाचे एकत्रीकरण करून तो शेतमाल उत्पादक कंपनीच्या माध्यमातून योग्य भाव मिळेल यासाठी विक्री सुविधा निर्माण करणे म्हणजेच पर्यायी बाजारपेठ (AlternativeMarket ) विकसित करणे हा प्रमुख उद्देश आहे.

## प्रकल्पाचे ध्येय :-

महाराष्ट्र स्पर्धाक्षम कृषि विकास प्रकल्पाअंतर्गत एकूण ४०० उत्पादक कंपन्यांची निर्मिती करण्याचे उदिष्ट् असून यापैकी २०० कंपन्या ह्या धान्य-तेलबिया व २०० ह्या फळे-भाजीपाला या प्रकारच्या असतील. प्रत्येक जिल्हानिहाय १४ उत्पादक कंपन्यांची निर्मीती करण्याचे उदिष्ट् असून यापैकी साधारणपणे ७ कंपन्या ह्या धान्य-तेलबिया व ७ ह्या फळे-भाजीपाला या प्रकारच्या असतील. उत्पादक कंपनी भारतीय कंपनी कायदा १९५६ नुसार नोंदणीकृत असल्याने त्याला कायदेशीर दर्जा असेल.

## FCSC म्हणजे काय ?

एका विशिष्ट उद्देशापोटी उत्पादक घेणारे ३ ते ५ कि.मी. अंतरामधील १५ ते २० उत्पादक शेतकरी गट किंवा ३०० ते ३५० शेतकऱ्यांनी मिळून एका विशिष्ट उद्देशाने व ध्येयाने स्थापन केलेली उत्पादक कंपनीने निर्माण केलेले सुविधा केंद्र म्हणजे **"शेतकरी सामुदायिक सुविधा केंद्र" (Farmers Common Service Center-FCSC)**होय.

**शेतकरी उत्पादक गट, उत्पादक कंपनी व शेतकरी सामुदायिक सुविधा केंद्राचे टप्पे-**

- MACP प्रकल्पाच्या कार्यक्षेत्रामधून विक्रीयोग्य शेतमाल (Marketable Surplus) असणाऱ्या भागातून जेथे शेतक-यांना उत्पादक कंपनी निर्माण करण्याची इच्छा आहे अशा समान पिक घेणा-या (धान्य व फळे भाजीपाला) शेतक-यांचे उत्पादक गट तयार करणे.
- ३ ते ५ कि.मी. परीसरातील लगतच्या गावातून १५ ते २० अशा शेतकरी उत्पादक गटांची (३०० ते ३५० शेतकऱ्यांची) स्थापना करणे.
- १५ ते २० पात्र शेतकरी उत्पादक गटांचे एकत्रिकरण करून त्यांच्या उत्पादक कंपनीमध्ये निर्मीती करणे.
- उत्पादक कंपनीची शेतकरी सामुदायिक सुविधा केंद्रामध्ये (FCSC) उभारणी करणे.
- शेतकरी उत्पादक कंपनीचे स्वतंत्र खाते हे प्रामुख्याने राष्ट्रीयीकृत बँकेमध्ये उघडणे.
- सदर कंपनीचे व्यवस्थापन हे शेतकरी सभासदांच्या हाती गावस्तरावर असून त्याला कायदेशीर दर्जा असेल.

**शेतकरी सामुदायिक सुविधा केंद्रामध्ये (FCSC) सदस्यांच्या भूमिका व जबाबदाऱ्या–**

- उत्पादक गटातील सदस्यांनी स्वयंस्फूर्तीने FCSC मध्ये सहभागी होण्याची तयारी असावी.
- FCSC मधील सर्व कामकाज व उपक्रमामध्ये सहभागाची तयारी असणे आवश्यक आहे.
- उत्पादक गटातील सदस्यांने स्वतःचे भागभांडवलाची रक्कम उत्पादक कंपनीकरीता देण्याची तयारी असावी.
- सदस्याने उत्पादीत केलेला शेतमाल उत्पादक कंपनीस (FCSC) करीता देण्याची तयारी असावी.
- सदस्याने बाजाराशी निगडीत व उत्पादक कंपनीने ठरविलेल्या मार्गदर्शनानुसार उत्पादन घेण्याची तयारी असावी.

**सेवा पुरवठादाराची निवड पध्द्ती -**

- जागतिक बँकेच्या संपादन धोरणानुसार स्पर्धात्मक निविदा प्रक्रीयेव्दारे प्रकल्प अंमलबजावणी कक्ष (कृषि) मार्फत सेवा पुरवठादार संस्थेची निवड करण्यात येते.
- एम.ए.सी.पी. प्रकल्पाकडून शेतकरी उत्पादक कंपनी / शेतकरी सामुदायिक सुविधा केंद्र (Farmers Common Service Center-FCSC) ची उभारणी करण्याकरीता प्रकल्प टप्पा एक मधील १० जिल्ह्यांमधून (अहमदनगर, औरंगाबाद, अमरावती, अकोला, जालना, परभणी, वाशिम, बुलढाणा, यवतमाळ, हिंगोली) यवतमाळ, हिंगोली, अहमदनगर व औरंगाबाद जिल्ह्यांकरीता सेवा पुरवठादार संस्थेची (Service Provider) निवड झाली आहे. सदर सेवा पुरवठादार संस्थेचा कार्यकाल महाराष्ट्र स्पर्धाक्षम कृषि विकास प्रकल्पासोबत करार अस्तित्त्वात आल्यापासून ३६ महिने असणार आहे.

- प्रकल्प टप्पा १ मधील ४उर्वरीत जिल्ह्यांकरीता (अमरावती, वाशिम, अकोला व बुलढाणा) NGO सेवा पुरवठादार संस्थेमार्फत गट निर्मीतीची व त्यांची क्षमता बांधणीची कामे पूर्ण झाली असून सदर उत्पादक गटांचे उत्पादक कंपनीमध्ये नोंदणी करुन एफ.सी.एस.सी. सुविधेची निर्मिती करण्याकरीता BASIX & INI, Mumbai सेवापुरवठादार संस्थेची निवड जानेवारी २०१४ मध्ये झाली असून सदर सेवा पुरवठादार संस्थेचा कार्यकाल २४ महिने असणार आहे.
- प्रकल्प टप्पा २ मधील ११ व प्रकल्प टप्पा ३ मधील १२ जिल्हयाकरीता NGO सेवा पुरवठादार संस्थेची निवड प्रक्रिया पूर्ण झाली असून सदर संस्थेमार्फत गट निर्मीतीची व क्षमता बांधणीची कामे सुरु झाली आहेत. सदर NGO सेवा पुरवठादार संस्थेचा कालावधी हा १५ महिन्याचा असेल त्यापैकी ०९ महिन्याचा कालावधी पूर्ण झाल्यानंतर उर्वरीत ०६ महिने सदर NGO सेवापुरवठादार संस्था व FCSC सेवापुरवठादार संस्था यांनी दोघांनी मिळून निर्मीती झालेल्या उत्पादक गटांना मार्केट लिंकेज बाबत प्रशिक्षण, अभ्यास, सहलीचे आयोजन ,उत्पादक कंपनीचे महत्व , उत्पादक कंपनी कायदा व सहकार कायदा या दोन्ही मधील फरक, इ. कामे पार पाडणार आहेत.

- प्रकल्प टप्पा २ मधील ११ जिल्हयाकरीता (नागपूर, वर्धा, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर, गडचिरोली, नांदेड, सोलापूर, लातूर, बीड, उस्मानाबाद) व प्रकल्प टप्पा ३ मधील १२ जिल्हे (ठाणे, रायगड, सिंधुदूर्ग, रत्नागिरी, सातारा, सांगली, कोल्हापूर, पुणे, नाशिक, धुळे, नंदुरबार, जळगाव) असे एकूण २३ जिल्ह्याकरीताखालील एफ.सी.एस.सी. सेवापुरवठादार संस्थेची निवड सप्टेंबर २०१४ मध्ये झाली असून सदर सेवा पुरवठादारांचा कार्यकाल महाराष्ट्र स्पर्धाक्षम कृषि विकास प्रकल्पासोबत करार अस्तित्त्वात आल्यापासून २४ महिने असणार आहे.

| अ. क्र. | पॅकेज क्र.व जिल्ह्याचे नावं | सेवापुरवठादार संस्था | कार्यकाल |
|---|---|---|---|
| १ | यवतमाळ व हिंगोली | Wipro pvt. Ltd., Pune. | ३६ महिने |
| २ | जालना व परभणी | MART, Noida. | ३६ महिने |
| ३ | औरंगाबाद व अहमदनगर | Wipro pvt. Ltd., Pune. | ३६ महिने |
| ४ | अमरावती, वाशिम, अकोला व बुलढाणा | BASIX, Hyedrabad. | २४ महिने |
| ५ | नागपूर, वर्धा, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर, गडचिरोली, | BASIX, Hyedrabad. | २४ महिने |
| ६ | नांदेड, लातूर, बीड, उस्मानाबाद | Divi Socio Techno Consultant, Aurangabad. | २४ महिने |
| ७ | नाशिक, धुळे, नंदुरबार, जळगाव | Divi Socio Techno Consultant,Aurangabad | २४ महिने |
| ८ | ठाणे, रायगड, सिंधुदूर्ग, रत्नागिरी, | Primove Consultancy Pvt. Ltd., Pune. | २४ महिने |
| ९ | सातारा, सांगली, कोल्हापूर, | Divi Socio Techno Consultant, Aurangabad. | २४ महिने |
| १० | पुणे, सोलापूर | Primove Consultancy Pvt. Ltd., Pune. | २४ महिने |

- **FCSC सेवापुरवठादार संस्थेची कामे–**
  - शेतकरी सामुदायिक सुविधा केंद्र (Farmers Common Service Center-FCSC) ची उभारणी करत असताना सेवापुरवठादार संस्थेमार्फत खालील कामे पार पाडणे अनिवार्य आहे.

**१) उत्पादक गटाचे मुल्यांकन –**

- सेवापुरवठार FCSC यांनी सेवापुरवठार NGO सेवापुरवठादारांमार्फत समुहामध्ये /क्लस्टर मध्ये निर्मीती झालेल्या १५ ते २० उत्पादक गट किंवा ३०० ते ३५० शेतकऱ्यांची बांधणी करून त्यांची उत्पादक कंपनी मध्ये नोंदणी करत असताना उत्पादक गटांचे मुल्यांकन करण्यासाठी खालील प्रमाणे मुल्यांकन चमुची निर्मिती करुन उत्पादक गटाचे मुल्यांकन करावे व ग्रेड 'अ' मधील उत्पादक गटांचा समावेश शेतकरी उत्पादक कंपनी निर्मिती करीत असताना करावा.

  १. संबंधीत जिल्ह्यातील आत्मा कार्यालयातील एक सदस्य
  २. सेवापुरवठादार NGO यांचा एक प्रतिनिधी
  ३. सेवापुरवठादार FCSC यांचा एक प्रतिनिधी

**२) उत्पादक गटांचे प्रशिक्षण –**

उत्पादक गटातील सभासदांचे गावपातळीवर प्रशिक्षण घेत असताना सेवापुरवठादार NGO व सेवापुरवठादार FCSC यांनी संयुक्तपणे शेतकरी उत्पादक गटांना कोणत्या विषयाचे प्रशिक्षण आवश्यक आहे याबाबत TNA(Traning Need Assesment) करुन त्याप्रमाणे प्रशिक्षणाची कार्यक्रम पत्रिका तयार करावे. प्रशिक्षण कार्यक्रमामध्ये तज्ञ व्यक्ती मार्फत प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करुन त्याची अंमलबजावणी करावे.

**३) शेतकरी उत्पादक कंपनीची क्षमता बांधणी –**

शेतक-यांची उत्पादक कंपनी निर्मिती करीत असताना खालील घटकांवर उत्पादक कंपनीचे संचालक मंडळ व सभासदांची क्षमताबांधणी करावी.

१. फरक - सहकार कायदा आणि कंपनी कायदा

२. भागभांडवल जमा करण्याचे नियोजन –

- प्रत्येक संचालकास १०० सभासदांकडून भागभांडवल जमा करण्याची जबाबदारी निश्चित करणे.
- भागभांडवल लवकरात लवकर जमा होण्यासाठी संचालक मंडळाची व सभासदांची बैठका घेऊन क्षमता बांधणी करणे इ.
- उत्पादक कंपनीच्या शेअर्स हे Members या तत्वावर देण्यात यावा.

३. भागभांडवलाचे वाटपाची पध्दत इ.

**४) शेतक-यांची उत्पादक कंपनी मध्ये नोंदणी – (परिशिष्ट - अ)**

- शेतकरी उत्पादक कंपनी निर्मिती करण्याकरीता सेवापुरवठादार NGO व सेवा पुरवठादार FCSC यांनी समन्वयाने उत्पादक गटांचे Identified Cluster मध्ये सर्व्हे करुन Surpluse Produce ची माहितीची खातरजमा करणे.
- सेवा पुरवठादार FCSC - शेतकरी उत्पादक कंपनी निर्मिती करण्याकरीता शेतक-यांना facilitate करून शेतक-यांची उत्पादक कंपनी मध्ये नोंदणी करण्याकरीता प्रामुख्याने प्रयत्न करणे अपेक्षित आहे.
- सेवा पुरवठादार FCSC यांनी TOR मध्ये नमुद केल्याप्रमाणे Company Secretary सोबत Collaboration करुन तसे पत्र एम.ए.सी.पी. प्रकल्पासोबत करार करीत असताना कार्यालयास सादर करावे.
- उत्पादक कंपनीची निर्मिती जरी ३५०-४०० सभासदांनी होत असली तरी भविष्यात व्यावसायिक दृष्टया उत्पादक कंपनीची प्रगती होण्याच्या दृष्टीने सदस्य संख्या आवश्यकतेप्रमाणे वाढविण्याची तरतूद असावी.
- उत्पादक कंपनीची निर्मिती केल्यानंतर उत्पादक कंपनीच्या सदस्यांना कोणतेही मोठी आश्वासने देऊ नये.

५) **Staff Replacement –**

१. सेवापुरवठादार FCSC यांनी Staff बदलताना प्रकल्पाची मान्यता घेऊन Staff बदलावा.
२. जर सेवापुरवठादार FCSC यांना क्षेत्रिय पातळीवरील Staff बदलावयाचे असेल त्यावेळी बदलून येणा-या कर्मचारी हा मराठी भाषेचा ज्ञान असलेला असावा.
३. जर सेवापुरवठादार FCSC यांचा एखाद्या जिल्ह्यातील क्षेत्रिय पातळीवरील Staff मार्फत प्रगती होत नसेल तर सेवापुरवठादार यांनी दुस-या जिल्ह्यातील क्षेत्रिय पातळीवरील Staff ची नेमणुक करुन मागे राहीलेल्या जिल्ह्यातील कामामध्ये प्रगती करुन घ्यावी.
४. शेतकरी सामुदायिक सुविधा केंद्राचा व्यवसायिक प्रस्ताव (Business Plan) तयार करणे,
५. उत्पादीत शेतमाल विक्रीसाठी मार्केटसोबत जोडणी (Market Linkage) करणे,
६. उत्पादक कंपनीचा कार्यविस्तार होण्याच्या दृष्टीने बँकेसोबत जोडणी (Bank Linkage) करणे तसेच,
७. शेतकरी सामुदायिक सुविधा केंद्रासाठी बांधकाम आराखडे व नकाशे तयार करणे,
८. खर्चाचे अंदाजपत्रक व कामांचा तपशील, निविदा कागदपत्रे तयार करणे व कामाच्या यशस्वीतेबाबत (Feasibility) अहवाल तयार करणे तसेच,
९. उत्पादक कंपनीच्या बळकटीकरणासाठी इतर शासकीय व अशासकीय योजनांचा लाभ मिळवून देणे इ.
१०. FCSC ची जोडणी वखार महामंडळाच्या गोदामांशी करून त्यांना शेतमाल साठवणूकींवर कर्ज व ई-ट्रेडींग सुविधांचा लाभ देणे.

११. उत्पादक कंपनींच्या कामावर सनियंत्रण ठेवणे व मार्गदर्शन करणे ही कामे सेवा पुरवठादार संस्था FCSC करणार आहेत.

**व्यवसायिक प्रस्ताव – (**Business Proposal)

- कोणताही व्यवसाय करावयाचा असेल तर त्याकरीता व्यवसायाची रूपरेषा, बाजारपेठेची माहिती इ. बाबींची माहिती असणे आवश्क असते. शेतकरी सामुदायिक सेवा केंद्राचा प्रस्ताव तयार करीत असतांना सेवा पुरवठादाराकडून उत्पादीत मालाच्या विक्रीकरीता बाजारपेठ, वाहतूक व्यवस्था, विजपुरवठा इ. बाबतचा प्रामुख्याने विचार केला जाईल व नेमलेल्या सेवा पुरवठादाराकडून वेळोवेळी मार्गदर्शन केले जाईल.
- उत्पादक कंपनीचा व्यवसायिक प्रस्ताव हा उत्पादक कंपनीच्या पुढाकाराने व नियुक्त केलेली सेवा पुरवठादार संस्था व कृषि व्यवसाय प्रोत्साहन सुविधा (Agri.- Business Promotion Facility) सेवा पुरवठादार संस्था या तिघांच्या संयुक्त विचाराने तयार केला जाईल. कृषि व्यवसाय प्रोत्साहन सुविधा यांच्या मान्यतेने सदर प्रस्ताव संबंधीत जिल्ह्याचे आत्मा कार्यालयामार्फत महाराष्ट्र स्पर्धाक्षम कृषि विकास प्रकल्प, पुणे या कार्यालयाकडे मंजूरीस्तव पाठवला जाईल. महाराष्ट्र स्पर्धाक्षम कृषि व्यवसाय प्रकल्प, पुणे यांच्या मुल्यमापनानंतर व तपासणी नंतर संबंधीत प्रस्तावास मंजूरी दिली जाईल.

**निधी वितरण प्रक्रीया–**

प्रकल्पासाठी नियुक्त FCSC सेवा पुरवठादार संस्थेने स्थापीत केलेल्या शेतकरी उत्पादक कंपन्यांच्या व्यावसायिक प्रस्तावास महाराष्ट्र स्पर्धाक्षम कृषि व्यवसाय प्रकल्प, पुणे या कार्यालयाकडून मान्यता मिळाल्यानंतर संबंधीत जिल्ह्याचे प्रकल्प संचालक आत्मा यांना संचालक आत्मा, कृषि आयुक्तालय, पुणे यांचा उत्पादक कंपनीस निधी वितरण करण्याबाबतचा आदेश पाठविला जाईल. प्रकल्प संचालक आत्मा यांनी संचालक आत्मा, कृषि आयुक्तालय, पुणे यांचा आदेश प्राप्त झाल्यानंतर संबंधीत उत्पादक कंपनीस पत्र देऊन / त्यांची बैठक घेऊन त्यांना FCSC ची कामे सुरु करण्याबाबतचे पत्र देईल. FCSC ची कामे करीत असताना जागतिक बँकेच्या संपादन पध्दतीची माहिती देणे अनिवार्य आहे.

**महाराष्ट्र स्पर्धाक्षम कृषि विकास प्रकल्पासाठी नियुक्त सेवा पुरवठादार संस्थेने स्थापीत केलेल्या उत्पादक कंपन्यासाठी -**

- प्रकल्प संचालक आत्मा यांनी संबंधित उत्पादक कंपनीस काम सुरु करण्याबाबत पत्र दिल्यानंतर उत्पादक कंपनीने व्यावसायिक प्रस्तावामधील समाविष्ट बाबींवर त्यांचा स्वहिस्सा २५% रक्कम रु. ४.५० लक्ष खर्च करुन झालेल्या कामाचे उपयोगिता प्रमाणपत्र, फोटो, बिले व प्रथम हप्त्याची मागणी पत्र उत्पादक कंपनी संबंधित जिल्हाचे प्रकल्प संचालक, आत्मा या कार्यालयास सादर करेल.
- संबंधित जिल्हाचे प्रकल्प संचालक, आत्मा यांनी उत्पादक कंपनीचा हप्ता मागणीचा प्रस्ताव प्राप्त झाल्यापासून १० दिवसाच्या आत संबंधित उत्पादक कंपनीस निधी वितरण करण्याच्या दृष्टीने प्रकल्प उप संचालक - २ व कृषि पणन तज्ञ यांच्यामार्फत संबंधित उत्पादक कंपनीस भेट देऊन त्यांच्या

झालेल्या कामाची पडताळणी व पाहणी करुन तसा अहवाल प्राप्त करवून घेतील व त्याची खातरजमा झाल्यानंतर संबंधीत उत्पादक कंपनीस प्रकल्पाची प्रथम हप्त्याची अनुदानित रक्कम रु. ११.५० लक्ष उत्पादक कंपनीच्या बॅंक खात्यात अग्रीम स्वरुपात जमा करतील.

- एम.ए.सी.पी. प्रकल्पामार्फत प्राप्त झालेल्या निधीतून व्यवसाय प्रस्तावातील नमूद सर्व कामे पूर्ण करून झालेल्या सर्व कामाचे प्रकल्पामार्फत लेखापरीक्षण करण्यात येईल.
- प्रकल्पामार्फत लेखापरीक्षण पूर्ण झाल्यानंतर अनुदानाचा अंतिम हफ्ता रक्कम रु. २.०० लक्ष प्रतिपूर्ती स्वरूपात वितरीत करण्यात येईल.
- प्रकल्प निकषाप्रमाणे व व्यवसायिक प्रस्तावाप्रमाणे संबंधीत उत्पादक कंपनीचे कामे पूर्ण झाल्याचे प्रमाणपत्र संबंधीत जिल्हयाच्या आत्मा कार्यालयातून उत्पादक कंपनीस वितरीत करण्यात येईल.

## FCSCधान्य व तेलबिया–

महाराष्ट्र स्पर्धाक्षम कृषि विकास प्रकल्पाच्या माध्यमातून सेवापुरवठादार यांनी प्रकल्पांतर्गत निर्माण केलेल्या उत्पादक कंपनीमार्फत धान्य व तेलबिया या प्रकाराची शेतकरी सामुदायिक सुविधा केंद्र (Farmers Common Service Center-FCSC) ची उभारणी करीत असताना टप्पा १ मध्ये रु. १८.०० लक्ष पर्यंतची अनुदानाची तरतूद करण्यात आली आहे. यापैकी लाभार्थी हिस्सा २५ % (रु. ४.५० लक्ष) भरणे अनिवार्य आहे. शेतकरी उत्पादक कंपनीचे संचालक मंडळ व सेवापुरवठादार FCSC यांनी मिळून व्यावसायिक प्रस्तावानुसार साधारणतः खालील बाबींचा समावेश करावा.

- प्रती FCSC- १.० टन प्रति तास क्षमता असलेले स्वच्छता, वर्गीकरण व पॅकींग मशिनरीसह शेडचे बांधकाम.
- साठवणूक व वाळवणूकीमध्ये सुधारणा करणे, पॅकींगसाठी साहित्य (उदा.पोती, सुतळी इ.)
- इतर आवश्यकतेनुसार लागणारी शेती उपकरणे.
- सेवापुरवठादार यांनी उत्पादक कंपनी/ FCSC ची जोडणी वखार महामंडळाच्या गोदामांशी करून त्यांना शेतमाल साठवणूकींवर कर्ज व ई-ट्रेडींग सुविधांचा लाभ देण्यासाठी प्रयत्न करणे व याचा अहवाल प्रकल्प संचालक आत्मा यांना सादर करणे.
- शेतमालासह बाजारपेठेशी जोडणी व बॅंकेस आर्थिक सहकार्यासाठी जोडणी.

## FCSC फळे व भाजीपाला-

महाराष्ट स्पर्धाक्षम कृषि विकास प्रकल्पाच्या माध्यमातून सेवापुरवठादार यांनी प्रकल्पांतर्गत निर्माण केलेल्या उत्पादक कंपनीमार्फत फळे व भाजीपाला या प्रकाराची शेतकरी सामुदायिक सुविधा केंद्र (Farmers Common Service Center-FCSC) ची उभारणी करीत असताना टप्पा १ मध्ये रु. १८.०० लक्ष पर्यंतची अनुदानाची तरतूद करण्यात आली आहे. यापैकी लाभार्थी हिस्सा २५% (रु. ४.५० लक्ष) भरणे अपेक्षित आहे. शेतकरी उत्पादक कंपनीचे संचालक मंडळ व सेवापुरवठादार FCSC यांनी मिळून व्यावसायिक प्रस्तावानुसार साधारणतःखालील बाबींचा समावेश करावा.

**पहिला टप्पा-** (२०० FCSC करीता) प्रति FCSC रू.१८.०० लक्ष, सहभाग लाभार्थी हिस्सा २५% (४.५ लक्ष) व प्रकल्प अनुदान ७५% (१३.५ लक्ष) (जमिनीची किंमत सोडून)

- २०० FCSC मध्ये स्वच्छता, प्रतवारी, व पॅकींग च्या सुविधा निर्माण करणे.
- लहान ३०० चौ. फूट आकाराची चांगली जमिन, पुरेशी हवा, प्रकाश सुविधा व शौचालयाच्या सुविधेसह बांधलेली सिमेंट पत्रा अच्छादित बंदिस्त खोली
- गरजेनुसार प्लॅस्टिक क्रेटस्, वजनकाटा, पॅकिंग मशिन,
- फळे व भाजीपाला वर्गीकरण व पॅकींग करण्यासाठी टेबल (गरजेनुसार)
- इतर आवश्यकतेनुसार लागणारी शेती उपकरणे.

## FCSC संपादन प्रक्रीया -

- उत्पादक कंपनीची कामे ही गावस्तरावरूनच होणार असल्यामुळे अनुषांगिक संपादनाची प्रक्रीया ही जागतिक बँकेच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार पार पाडली जाईल याची नोंद घ्यावी व ही कामे करीत असताना सेवापुरवठादार वारंवार मार्गदर्शन व सनियंत्रण करतील.
- कंपनी व्यवस्थापकाची निवड -उत्पादक कंपनीने कंपनीच्या कामाची गती वाढवण्यासाठी व कंपनीची क्षमता विकसीत होण्याच्या दृष्टीने उत्पादक कंपनीच्या स्तरावरुन कंपनीच्या किंवा तत्स्म कामाचा अनुभव असणा-या व्यक्तिची निवड कंपनी व्यवस्थापक या पदासाठी करावी.
- कंपनी व्यवस्थापकाची उत्पादक कंपनीमार्फत निवड झाल्यानंतर एम.ए.सी.पी. प्रकल्पामार्फत कंपनी व्यवस्थापकास उत्पादक कंपनी स्थापन झाल्यानंतर पहिल्या वर्षासाठी रु. ६०,०००/- इतकी तरतूद करण्यात आली असून सदर रक्कम संबंधीत जिल्हयाच्या आत्मा कार्यालयामार्फत अदा करण्यात येईल.

१. संपादन समितीमधील रचना खालीलप्रमाणे FCSC –

| अ.क्र. | संपादन समिती | पद |
|---|---|---|
| १ | उत्पादक कंपनी अध्यक्ष | अध्यक्ष |
| २ | संचालक मंडळात निवड केलेली ३ सदस्य | सदस्य |
| ३ | प्रकल्प उपसंचालक आत्मा– २ | सदस्य |
| ४ | AME | सदस्य |
| ५. | बाजार क्षेत्र अभियंता | सदस्य |
| ६. | उत्पादक कंपनी व्यवस्थापक | सदस्य सचिव |

**टिप : अ.क्र.३ मध्ये जर** प्रकल्प उपसंचालक आत्मा – २/AME पद रिक्त असल्यास प्रकल्प उपसंचालक – १/BTM यांची नियुक्ती करावी.

**संपादन प्रक्रीया पध्द्त–**

१. शेतकरी सामुदायिक सुविधा केंद्र (Farmers Common Service Center-FCSC) ची उभारणी करीत असताना व्यवसायिक प्रस्तावाप्रमाणे संपादन करावयाची कामे ही जागतिक बँकेच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार खालील दोन पध्द्तीमध्ये पार पाडली जाते.

    १. फोर्स अकाऊंट पध्द्त

    २. शॉपींग पध्द्त

२. शेतकरी सामुदायिक सेवा केंद्र बांधकाम स्वतः किंवा निविदा (Tender) पध्द्तीने करू शकेल.

३. शेतकरी सामुदायिक सेवा केंद्र बांधकाम साहित्य व मंजुरीबाबत किमान ३ संस्थांकडून निविदा मागवेल.

४. शेतकरी सामुदायिक सेवा केंद्रास स्वतः काम करावयाचे असेल तर प्रकल्पाच्या बाजार क्षेत्र अभियंता (Market Field Engineers) यांच्या मार्गदर्शनाखाली बांधकाम साहित्य खरेदी करून कुशल व अकुशल कामगारांमार्फत पूर्ण करील.

५. प्राप्त निविदा कंत्राटदार, निविदा भरणारे लोक/ पुरवठादार यांच्या समक्ष उघडल्या जातील.

६. निविदा / दरपत्रके यांचे मुल्यमापन करून अंतिम निर्णय संपादन समिती (Procurement committee) घेईल. या समितीमध्ये चेअरमन/ अध्यक्ष, व्यवस्थापन समितीतील ३ सदस्य, संबंधीत तालुका कृषि अधिकारी व शेतकरी सामुदायिक सेवा केंद्राचे व्यवस्थापक असतील.

७. निवडलेल्या संस्थेचे कामे व साहित्य खरेदी संदर्भातील आदेश उत्पादक कंपनी देईल.

८. करारपत्र झाल्यानंतर १५ दिवसांचे आत कंत्राटदार निवडलेल्या शेतकरी सामुदायिक येवा केंद्रामध्ये काम चालू करेल. हे काम करारपत्रातील नियम व अटीनुसार केले जाईल. कामाचा आराखडा, मंजूर प्लॅन व वेळापत्रकानुसार काम होत असल्याची खात्री नियुक्त केलेली सेवापुरवठादार संस्था प्रकल्पातील बाजार क्षेत्र अभियंता करील.

**शेतकरी सामुदायिक सेवा केंद्र स्तरावर अद्यावत ठेवावयाचे दस्तऐवज-**

१) उत्पादक कंपनीचे ठराव रजिष्टर

२) उत्पादक कंपनीले केलेल्या कार्यक्रमाच्या अहवालाचे रजिष्टर.

३) उत्पादक कंपनीच्या मालमत्तेचे रजिष्टर.

४) उत्पादक कंपनीचे रजिष्टर्स – परिशिष्ट

**बांधकाम पूर्णत्त्वाचा अहवाल -**

- करारपत्राचे नियम, नियमावली व अटीनुसार काम पूर्ण झाल्याचा अहवाल सेवा पुरवठादार संस्था तयार करेल.
- उत्पादक कंपनीचे व्यावसायिक प्रस्तावाप्रमाणे कामे पूर्ण झाल्यानंतर प्रकल्प संचालक आत्मा यांनी खालील चमूमार्फत कार्य पूर्तीचा अहवाल मागवून घ्यावा व सदर अहवालाची शाहनिशा करुन एम.ए.सी.पी. प्रकल्प कार्यालयास पुढील कार्यवाहीसाठी सादर करावा.

| सदस्याचे नाव | पद |
|---|---|
| उत्पादक कंपनी अध्यक्ष | अध्यक्ष |
| प्रकल्प उपसंचालक – १/२ | सदस्य |
| कृषि पणन तज्ञ | सदस्य |
| मार्केट फिल्ड इंजिनिअर | सदस्य |
| उत्पादक कंपनी व्यवस्थापक | सदस्य सचिव |

**आत्मा जिल्हा व तालुका स्तरावरुन उत्पादक कंपनी नोंदणी पूर्व करावयाची कामे:-**

- एम.ए.सी.पी. प्रकल्पांतर्गत, नव्याने निर्माण झालेल्या उत्पादक कंपनी यांची उत्पादक कंपनी मध्ये नोंदणी होण्याच्या दृष्टीने आढावा व पाठपुरावा करणे.
- प्रकल्प संचालक आत्मा यांनी सेवापुरवठादाराने उत्पादक कंपनी/ FCSC ची जोडणी वखार महामंडळाच्या गोदामांशी करून त्यांना शेतमाल साठवणूकींवर कर्ज व ई-ट्रेडींग सुविधांचा लाभ देण्यासाठी सेवापुरवठादारावर नियंत्रण ठेवणे.
- एम.ए.सी.पी. प्रकल्पांतर्गत, निर्माण झालेल्या उत्पादक कंपनी यांना प्रकल्पातून सहाय्य देण्यापूर्वी जागा १०००० स्के.फुट., लोकवाटा (स्वहिस्सा) २५%(रक्कम रु. २.५० लक्ष) व व्यवसायिक प्रस्ताव इ. बाबतची पडताळणी व मोका तपासणी करणे.
- सेवापुरवठादार FCSC यांच्या मदतीने निर्माण झालेल्या शेतकरी उत्पादक कंपन्याचे व्यवसायिक प्रस्ताव तात्काळ तयार करुन एम.ए.सी.पी. कार्यालयास सादर करणे.
- एम.ए.सी.पी. प्रकल्पांतर्गत, निर्माण झालेल्या उत्पादक कंपन्याची व्यसायिक प्रस्तावांची पडताळणी प्रकल्प संचालक, आत्मा व कृषि पणन तज्ञ यांनी करुन, संबधित उत्पादक कंपनीचे संचालक, मंडळ यांच्या मान्यतेने (व्यवसायिक प्रस्तावावर सही व शिक्का घेणे) परिपूर्ण व्यवसायिक प्रस्ताव एम.ए.सी.पी. कार्यालयास सादर करणे.

**आत्मा जिल्हा व तालुका स्तरावरुन उत्पादक कंपनी नोंदणी पश्चात करावयाची कामे :**

- सेवापुरवठादार यांच्या कामकाजाचा आढावा घेणे व वेळोवेळी मार्गदर्शन व सनियंत्रण करणे.
- जागतिक बँकेच्या मार्गदर्शक तत्वानुसार FCSC कामकाजावर देखरेख व सनियंत्रण करणे.
- उत्पादक कंपनीच्या दैनंदिन कामकाजावर देखरेख करणे.
- FCSC केंद्रातील दैनंदिन कामकाज, जमाखर्चाच्या नोंदी, देखरेख, कार्यकारी मंडळाची कामाचा व झालेल्या खर्चाचा आढावा घेणे तसेच पुढील कामाचे नियोजन करणे.
- उत्पादक कंपनीमधून कर्मचारी वर्ग व व्यवस्थापकाची नेमणूक, संस्थेची दैनंदिन कामे, संस्थेचे दप्तर, लेखे व हिशोब अद्ययावत आहेत याची खात्री करणे.
- प्रतिवर्षी लेखापरिक्षण करुन लेखा परिक्षण अहवाल नोंदणी कार्यालय, आयकर कार्यालय यांना सादर करण्याबाबत पाठपुरावा करणे.

- वार्षिक नफ्याची/उत्पन्न/आढावा यांची विभागणीवर उत्पादक कंपनीची वार्षिक सर्वसाधारण सभा, आवश्यकतेनुसार विशेष साधारण सभांचे आयोजन, संस्थेचे वार्षिक अहवाल (आर्थीक व प्रागतिक) मंजूर करुन व पुढील आर्थिक वर्षामध्ये करावयाची कामे, संभाव्य खर्च याबाबत धारेणात्मक निर्णय घेतले की नाही यावर नियंत्रण ठेवणे.
- उत्पादक कंपनीची प्रगती दर्शविणारी माहिती संस्थेच्या नोटीस बोर्डवर लावल्याबाबत सुचना देणे.

**उत्पादक कंपनी नोंदणी पश्चात करावयाची कामे :**

- संस्थेचे दैनंदिन कामकाज व जमाखर्चाच्या नोंदी ठेवणे.
- कार्यकारी मंडळाची नियमितपणे बैठक घेऊन कामाचा व झालेल्या खर्चाचा आढावा घेणे तसेच पुढील कामाचे नियोजन करणे.
- संस्थेसाठी कर्मचारी वर्ग व व्यवस्थापकाची नेमणूक करुन संस्थेची दैनंदिन कामे करणे व संस्थेचे दप्तर, लेखे व हिशोब अद्ययावत ठेवणे.
- संस्थेचे प्रतिवर्षी लेखा परिषण करुन लेखा परिक्षण अहवाल नोंदणी कार्यालय, आयकर कार्यालय यांना सादर करणे.
- संस्थेचे रिटर्नस, दरवर्षी आयकर कार्यालयास सादर करणे.
- संस्थेच्या वार्षिक नफ्याची/उत्पन्न/आढावा यांची विभागणी करणे.
- संस्थेच्या नियमावलीनुसार कार्याकारी मंडळाचा कार्यकाळ निश्चित केलेला असतो. या कालावधीची पूर्तता होण्यापूर्वी निवडणूक प्रक्रिया सुरु करणे.
- संस्थेच्या दैनंदिन कामकाजावर देखरेख ठेवण्यासाठी संस्थेतील पदाधिकारी (उदा. अध्यक्ष, सचिव) यांना अधिकार देऊन त्यांचे मार्फत संस्थेचे कामकाज पाहणे.

## (परिशिष्ट– १ ब) –उत्पादक गटाचे मुल्यांकन

जिल्हा- तालुका- कार्यक्षेत्राचे नाव -

| अ.क्र. | उत्पादक गटाचे नाव | गाव | उत्पादक गटांचा प्रमुखाचे नाव | उत्पादक प्रमुखाचे संपर्क क्र. Contact No. of PG leader | दि. Date of assessment | वर्ग Grade | जोडलेली कागदपत्रे |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | |

**Annex. 1 c.1 – Training Calendar of PGs on market Linkage Training (to be assigned jointly with SP NGO).**

जिल्हा- तालुका- कार्यक्षेत्राचे नाव -

| अ.क्र. | उत्पादक गटाचे नाव | गाव | उत्पादक गटांचा प्रतिनिधी | उत्पादक गटप्रतिनिधी संपर्क क्र. | Proposed Date of Training | प्रशिक्षणाचे ठिकाण Venue of Training | विषय Subject | Resource persons | शेरा Remarks |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | |

**Team Leader**
**SP NGO**

**Team Leader**
**SP FCSC**

**PD ATMA**
**Dist. -**

**Annex. 1 c 2. – Report on Joint Training of PGs**

जिल्हा- तालुका- कार्यक्षेत्राचे नाव -

| Sr. No. | Name of PG | Village | Name of PG Leader | Contact No. of PG leader | Date of Training | Resource Person | Subject | No. of farmers Trained | ATMA / Agri. Dept. represent ative |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | |

**Note – Attach copy of Training material with this Report.**

**Team Leader**
**SP NGO**

**Team Leader**
**SP FCSC**

**PD ATMA**
**Dist. -**

## Annex.1 d 1 – Calendar of Rallies / Meeting for forming PC

| Sr. No. | Dist. | Block | Name of Clusters | Date of Rally | Venue | Resource Person | No. of farmer attended | ATMA / Agri. Dept. representative | Remarks |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | |
| | | | | | | | | | |
| | | | | | | | | | |
| | | | | | | | | | |
| | | | | | | | | | |

## Annex.1 d. 2– Report of Rallies / Meeting for forming PC

जिल्हा- तालुका- कार्यक्षेत्राचे नाव -

| Sr. No. | Name of PA/PC | Village | Name of PA Leader | Contact No. of PA leader | Date of Training | Resource Person | Subject | No. of farmers Trained | ATMA / Agri. Dept. representative |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | |
| | | | | | | | | | |
| | | | | | | | | | |

**Note – Attach copy of Training material with this Report.**

**Team Leader**
**SP NGO**

**Team Leader**
**SP FCSC**

**PD ATMA**
**Dist. -**

## Annex. 2.1. a – Training Calendar of BODs.

जिल्हा- तालुका- कार्यक्षेत्राचे नाव -

| Sr. No. | Name of PG | Village | Name of PG Leader | Contact No. of PG leader | Proposed Date of Training | Venue of Training | Subject | Resource persons | Remarks |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | |
| | | | | | | | | | |
| | | | | | | | | | |

**Team Leader**
**SP NGO**

**Team Leader**
**SP FCSC**

**PD ATMA**
**Dist. -**

**Annex. 2.1 b – Identification Cluster for formation PC**

जिल्हा- तालुका- कार्यक्षेत्राचे नाव -

| Sr. No. | Name of PA/PC | BOD | | Commodity | No. of PGs involved | Total Members | Total Share holder | Total Amount of Share capital collected | FCSC Land Status | Date of PC awareness Training |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | names | Cont. No. | | | | | | | |
| | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | |

Note – Attach copy of Training material with this Report.

Team Leader<br>SP NGO

Team Leader<br>SP FCSC

PD ATMA<br>Dist. -

**Annex.2.2 - Report on Federation PGs & initiation of PCs.**

जिल्हा- तालुका- कार्यक्षेत्राचे नाव -

SP Name:

| Sr. No. | Name of Cluster Name Villages | No. Of PGs | No. of Farmers | Major Agri. Commodity | Identified | | Date of BOD members Training cum meeting of Promotion |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | BOD | Advisory Board | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |

**Annex. 2.3 a – Training Calendar of PAs**

जिल्हा- तालुका- कार्यक्षेत्राचे नाव -

| Sr. No. | Name of PA | Village | Name of PA Leader | Contact No. of PA leader | Proposed Date of Training | Venue of Training | Subject | Resource persons | Remarks |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | |
| | | | | | | | | | |
| | | | | | | | | | |

Team Leader<br>SP NGO

Team Leader<br>SP FCSC

PD ATMA<br>Dist. -

## Annex. 2.3 b – Report on Training of PAs

जिल्हा- तालुका- कार्यक्षेत्राचे नाव -

| Sr. No. | Name of PA | Village | Name of PA Leader | Contact No. of PA leader | Date of Training | Resource Person | Subject | No. of farmers Trained | ATMA / Agri. Dept. represe ntative |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | |
| | | | | | | | | | |
| | | | | | | | | | |

**Note – Attach copy of Training material with this Report.**

**Team Leader**
**SP NGO**

**Team Leader**
**SP FCSC**

**PD ATMA**
**Dist. -**

## Annex.2.4 - Report on Exposure visit.

| Sr. No. | Name of PA/PC | Date of Exposure visit | Place – PC visited | No. of farmer Participated | ATMA / Agri. Dept. representative |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

## Annex.6 - Training report on identified CRP (Community Resource Person)

| Sr. No. | Name of PC | Date of Training | Resource persons | ATMA / Agri. Dept. representative | No. of farmer Trained | Set of training material distributed |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |

## Annex.7 - Report on Business Plan.

| Sl. No | Dist. | Taluka | Village | Name of the PC | Business Activity Proposed | Project Cost (Rs.) |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |

## Annex. 8 – Convergence Plan incorporated in BP

| Sl. No | Item | Nos. | Cost | Total Nos. | Total Cost | Cost Sharing | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | Own Contri. | MACP | Other Scheme | Bank Loan | Timeline |
| | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | |

## Annex.B-1 - Report on Documents submitted to ROC.

| Sr. No. | Dist. | Block | Catchment | Cluster Name | Name of PC | BOD Nos. (M+F) | Document Collection Completed | DIN No. received | Docs. Submitted to ROC | Submission Date | Verified by ATMA / Agri. Dept. representative |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | |

## Annexure C – Details information of PA

| Sr. No. | Name of Dist. | Block Name | Catchment area | Cluster name | Name of Board Of directors (All name required) | Involved PG(nos.) | Total PA members (nos.) | Involved PG Name |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | **7** | **8** | **9** |
| | | | | | | | | |

| Member No. | | Cast Catagory | | | | PG member (Nos.) | PG Members name (Attach PG members list) | 7/12 of the involved farmers | Commodity (Type & Vol.) | Contribution | Land Status (XIV) | If Finalize |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| M | F | SC | ST | VJNT | NT | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 |
| | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | |